शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक:आवेवा-१००२/प्र.क्र.११/२००२/आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९ ऑगस्ट,२००२

संदर्भ :-(१) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक,क्रमांक:एसआरव्ही-१०६९-डी, दिनांक २६ जून,१९७०

(२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक:एसआरव्ही-१०७७/प्र.क्र. १२७/१९७९/आठ,दिनांक ४ डिसेंबर,१९७९,

(३)सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक:एसआरव्ही-१०८१/१४३३/ प्र.क्र.११९/आठ,दिनांक २४ डिसेंबर,१९८१.

(४)सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक:आवेवा-१०९०/प्र.क्र.१५२/आठ, दिनांक २९ ऑक्टोबर,१९९०,

EST-AK
मत २००० व २००१ चे
प्रस्ताव, तयार करावेत.

## परिपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात येतात. सदर आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्याबाबतची योजना यथास्थिती चालू ठेवावी किंवा कसे, तसेच त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे, यावर पुनर्विचार करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

२. उपरोक्त प्रस्तावावर अंतिम निर्णय होईपर्यन्त दि.१ ऑक्टोबर,२००२ रोजी देय होणाऱ्या आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यास पुढील आदेश होईपर्यन्त प्रस्तुत परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात येत आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना त्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

३. केवळ विहित मुदतीत प्राप्त होणारे दिनांक १ ऑक्टोबर,२००० व दिनांक १ ऑक्टोबर,२००१ रोजी देय झालेल्या आगाऊ वेतनवाढीचे प्रस्ताव प्रचलित नियमानुसार विचारात घेता येतील.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.

(कृ.प्र.प....

४. सदर आदेशाचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई